मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक ३०९ सातारा गुरूवार दि ८ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण राबविणार, ५ वर्षात ३० हजार कोटींचे उत्पन्न मिळणार : मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई :** महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण-२०२४ ला आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे होते. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारसीनुसार लॉजिस्टीक धोरण तयार करण्यात आले आहे. हे धोरण पुढील १० वर्षातील विकासाला समोर ठेऊन तयार करण्यात आले आहे. या धोरणामुळे राज्यात सुमारे ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. यातून सुमारे ३० हजार ५७३ कोटी उत्पन्न मिळेल असे अपेक्षित आहे.



सध्याच्या १४-१५टक्के च्या तुलनेत लॉजिस्टिकचा खर्च किमान ४-५टक्के ने कमी करणे, लॉजिस्टिकसाठी लागणारा वेळ कमी करणे, विविध उपाययोजनांद्वारे हरित उपक्रम राबवून कार्बन उत्सर्जन कमी करणे, ब्लॉक चेन, कृत्रिम बुध्दीमत्ता, इंटलीजन्ट लॉजिस्टीक मॅनेजमेंट सिस्टमचा वापर, ग्रीन लॉजिस्टिक पार्कचा प्रसार, शाश्वत डिझाईन,मोडल शिफ्ट या बाबी समाविष्ट आहेत. या क्षेत्रात देशांतर्गत व परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, तसेच महाराष्ट्राला जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब दर्जा मिळवण्याचा प्रयत्न असेल. हे धोरण तयार करतांना महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, जवाहरलाल नेहरु पोर्ट प्राधिकरण, मुंबई पोर्ट ट्रस्ट, राज्य रस्ते विकास महामंडळ, एमएमआरडीए, सिडको, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचा सहभाग घेण्यात आला आहे.या धोरणांतर्गत राज्यात २०२९ पर्यंत १० हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील. यात आंतरराष्ट्रीय मेगा लॉजिस्टीक हब म्हणून पनवेल येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संलग्न नवी मुंबई-पुणे क्षेत्रात २ हजार एकरवर इंटरनॅशनल मेगा लॉजिस्टिक हबचा विकसित करण्यात येईल. त्याच्याशी नवी मुंबई ते पुणे हे क्षेत्र तळोजा, पाताळगंगा, रसायने, खोपोली, महाड, रोहा, चाकण,तळेगांव या औद्योगिक वसाहती संलग्न असल्यामुळे हे क्षेत्र आंतराष्ट्रीय स्तरावरील व्यापार व उद्योगांचे प्रमुख केंद्र होईल. या हबच्या विकासासाठी पंधराशे कोटीची तरतूद करण्यात येईल.

नागपूर- वर्धा नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब हे पंधराशे एकरवर उभारण्यात येईल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाशी जोडला असून, नागपूर जिल्ह्याचे देशातील वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक केंद्रीय स्थानामुळे लॉजिस्टिक हबच्या विकासासाठी अनुकूल आहे. जिल्ह्यात ४ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग आणि एक समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर प्रगतीपथावर असून जिल्हा पूर्वीपासून मालवाहतूक करण्याचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखला गेला आहे. या हबसाठी देखील पंधराशे कोटीची तरतूद करण्यात येईल.

छत्रपती संभाजी नगर-जालना, ठाणे-भिवंडी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे- पुरंदर व पालघर- वाढवण या ५ ठिकाणी प्रत्येकी ५०० एकरवर राज्य लॉजिस्टीक हब लॉजिस्टीक सुविधा उपलब्ध करतील. या पाच हबसाठी २ हजार ५०० कोटीची तरतूद करण्यात येईल.

नांदेड-देगलूर, अमरावती - बडनेरा , कोल्हापूर-इचलकरंजी नाशिक - सिन्नर व धुळे-शिरपूर या पाच ठिकाणी प्रत्येकी ३०० एकर जागेवर प्रादेशिक हब उभारण्यात येईल. या पाच प्रादेशिक लॉजिस्टीक हबच्या विकासासाठी पंधराशे कोटीची तरतूद करण्यात येईल.

### राज्यात रब्बी ज्वारी खरेदीकरिता ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**मुंबई :** राज्यात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महसंघामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या रब्बी ज्वारी खरेदीसाठी दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यत मुदतवाढ देण्यात आल्याचे पणन महासंघाने कळविले आहे.

शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२३-२४ मध्ये बिगर आदिवासी क्षेत्रात धान व भरडधान्य (मका, ज्वारी व रागी) खरेदीसाठी पणन महासंघाची मुख्य खरेदी संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. रब्बी ज्वारी खरेदीसाठी पणन महासंघास ८ लाख २० हजार क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने तसेच नोंदणीकृत शेतकऱ्यांकडील रब्बी ज्वारी शिल्लक राहिल्याने शासनाने शिल्लक राहिलेल्या शेतकऱ्यांकडील ज्वारी खरेदीसाठी दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यत मुदतवाढ दिलेली आहे.

तसेच अमरावती जिल्ह्यासाठी ज्वारी खरेदीचे ८५ हजार क्विंटलचे वाढीव उद्दिष्ट देण्यात आले आहे. राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे, पण त्यांची ज्वारी अजून खरेदी झालेली नाही, अशा शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत त्यांची ज्वारी पणन महासंघाच्या केंद्रावर विक्रीसाठी आणावी.

### विना परवानगी झाड तोडल्यास ५० हजारांचा दंड होणार

**मुंबई :** राज्यात विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपलेली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात सध्या हालचाली वाढल्या आहेत. विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांचे दौरे सुरु आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीमधील पक्षांच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने विविध मतदारसंघाचा आढावा आणि उमेदवारांची चाचपणी सुरु असल्याचंही सांगितलं जातं. त्यातच राज्यात सध्या सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे.

या पार्श्वभूमीवरच आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यातील विविध प्रश्नासंदर्भात आढावा घेत सविस्तर चर्चा केली. याच बैठकीत १३ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आता दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## बेस्टचा ताफा ६ हजारपर्यंत वाढवा; आमची मुंबई, आमची बेस्टची मागणी

**मुंबई :** बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या बसचा ताफा कमी झाल्यामुळे बेस्टला अनेक लांब पल्ल्याचे मार्ग बंद करावे लागले आहेत. नादुरूस्त बस धावणे, छोट्या बस चालवणे असे प्रकार घडत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांचा प्रवास असह्य होत आहे. परिणामी, बेस्टचा ताफा ६ हजारापर्यंत वाढवण्याची मागणी 'आमची मुंबई, आमची बेस्ट'च्यावतीने बेस्ट दिनाच्या पार्श्वभूमीवर केली आहे.



बेस्टच्या विस्ताराच्या २०१९ सालापासून चर्चा होत आहेत. मात्र, त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. बेस्टकडे २०१० मध्ये ४,३८५ बसचा ताफा होता. मात्र, जुलै २०२४ मध्ये हा ताफा ३,१५८ पर्यंत कमी झाला असून त्यापैकी फक्त १,०७२ स्वमालकीच्या बस आहेत. येत्या काही वर्षात स्वमालकीच्या बसचा ताफा पूर्णपणे संपुष्टात येईल. बेस्ट ही सार्वजनिक वाहतूक पर्यावरणीयदृष्ट्या योग्य आहे. त्यामुळे बेस्टचा ताफा ६ हजारांपर्यंत वाढवणे आवश्यक आहे, असा सूर 'आमची मुंबई, आमची बेस्ट'च्यावतीने धरला आहे. काही वर्षापूर्वी बेस्ट ही भारतातील एक उत्कृष्ट सार्वजनिक बस सेवा होती. मुंबई महानगरपालिका आणि बेस्ट व्यवस्थापनाने बेस्ट सेवा कशी मोडकळीस आणता येते हे दाखवून देत खासगी कंत्राटदारांचे अविश्वसनीय आणि असुरक्षित जाळे तयार करून प्रवाशांना अनेक संकटाचा सामना करण्यास बस थांब्यावर ताटकाळत सोडले आहे. असे आमची मुंबई आमची बेस्ट या संघटनेच्या वतीने संघटनेचे समन्वयक विद्याधर दाते यांनी सांगितले.

देशातील सार्वजनिक वाहतुकीपेक्षा मुंबईतील बेस्टची वाहतूक उत्तम आहे. एकीकडे मेट्रोसाठी वेगळा न्याय आणि बेस्टला वेगळा न्याय दिला जातो. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी बेस्ट जगवली पाहिजे. त्यासाठी जनआंदोलन केले पाहिजे, असे प्रा. तपती मुखोपाध्याय म्हणाल्या.

## ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान

### अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविणार

**मुंबई :** ९ ऑगस्टपासून १५ ऑगस्टपर्यत राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या काळात अडीच कोटी घरे व आस्थापनांवर तिरंगा फडकविण्यात येईल तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येईल.

यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग नोडल विभाग राहणार असून ग्रामविकास विभाग हा ग्रामीण भागासाठी तर, नगर विकास विभाग हा शहरी भागांसाठी नोडल विभाग राहील.

या काळात तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा प्रतिज्ञा, सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हॉस, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेला, तिरंगा सेल्फी अशा विविध माध्यमातून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानातून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात येईल तसेच त्या-त्या जिल्ह्यांमध्ये पालकमंर्त्याच्या उपस्थितीत कार्यक्रम होतील. १३, १४ आणि १५ ऑगस्ट असे ३ दिवस घरोघर तिरंगा फडकविण्यात येईल.

## शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन

### महत्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता

#### महत्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता

**मुंबई :** शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातील शेतीला समृद्ध करणाऱ्या महत्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. ८७ हजार ३४२ कोटी ८६ लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे पावणेचार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार असून विशेषत: मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागाला मोठा फायदा होणार आहे.



या प्रकल्पामुळे गोदावरीच्या उपखोऱ्यातून वैनगंगेतील पाणी बुलढाणा जिल्ह्यातील वैनगंगा प्रकल्पात आणण्यात येईल. यासाठी एकूण ४२६.५२ कि.मी. चे जोड कालवे बांधण्यात येतील. विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यातील १५ तालुक्यांना सिंचन तसेच पिण्याचे पाणी आणि औद्योगिक कारणासाठी याचा उपयोग होईल. रब्बी हंगामात पाण्याचा वापर करता यावा म्हणून ३१ साठवण तलाव देखील बांधण्यात येणार आहेत. राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत याचा सविस्तर प्रकल्प अहवाल २०१८ मध्ये सादर करण्यात आला होता. केंद्रीय जल आयोगाने देखील यास मान्यता दिली असून राज्य जलपरिषदेच्या बैठकीत हा प्रकल्प एकात्मिक राज्य जल आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे.

### लाडकी बहीण योजने'साठी पुणेकरांची गर्दी, हवेली तालुका सर्वात पुढे

**पुणे :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरीता जिल्ह्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांनी ९ लाख ७२ हजार ८१९ अर्ज सादर केले असून अर्जाची छाननी प्रक्रिया मोहीम स्तरावर सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यातून हे अर्ज दाखल झआले असून पुणे (झ्ल्हा) शहरातून ७५ हजार ८७ अर्ज दाखल झाले आहेत. तर, हवेली तालुक्यातून सर्वाधिक अर्ज आले आहेत.

राज्य सरकारकडे प्राप्त झालेल्या आकेडवारीनुसार सोमवार ५ जुलै २०२४ पर्यत, हवेली तालुक्यात ३ लाख ५४ हजार ९७, पुणे शहर ७५ हजार ८१७, बारामती ६८ हजार ६२२, इंदापूर ६३ हजार ४८६, जुन्नर ५९ हजार ३१, शिरुर ५७ हजार २८७, खेड ५४ हजार ८०२, दौंड ५२ हजार ३४, मावळ ४६ हजार १३, आंबेगाव ३९ हजार ७५, पुरंदर ३७ हजार ९६७, भोर २९ हजार ४११, मुळशी २७ हजार ४३४ आणि वेल्हा ७ हजार ७४६ असे एकूण ९ लाख ७२ हजार ८१९ अर्ज सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी ८५.५७ टक्के अर्जावर निर्णय घेण्यात आला असून ७८.७८ टक्के अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

## महाराष्ट्रात आरक्षणाचा पेच भाजपामुळेच

### पंतप्रधानांनी आरक्षणाचा प्रश्न सोडवावा: नाना पटोले

**मुंबई :** राज्यातील आरक्षणाच्या प्रश्नाचा पेच हा भारतीय जनता पक्षाने निर्माण केला आहे. २०१४ साली देवेंद्र फडणवीस यांनीच मराठा, धनगर, आदिवासी समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतरही फडणवीस यांनी राणाभीमदेवी थाटात गर्जना करत, सत्तेत आलो तर २४ तासात आरक्षणांचा प्रश्न सोडवतो अशी वल्गना केली होती पण १० वर्ष केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असूनही आरक्षणाचा प्रश्न सोडवला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच आता पुढाकार घेऊन आरक्षणाचा प्रश्न सोडवावा, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले.



टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, आरक्षणाच्या मुद्द्यावरून भाजपाने राज्यातील जाती जातीत भांडणे लावण्याचे पाप केले आहे. शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा संपवण्याचे काम केले आहे. आरक्षणाच्या प्रश्नावरून भाजपाने मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल करुन सामाजिक एकोप्याला बाधा पोहचवली आहे. आरक्षणावर सत्तेत बसलेल्या लोकांना निर्णय घ्यायचा असताना ते विरोधी पक्षांनाच विचारत आहेत. काँग्रेस पक्षाची आरक्षणावर भूमिका स्पष्ट असून जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा हटवली पाहिजे असे राहुल गांधी यांनी जाहिरपणे सांगितले आहे आणि हे काम केंद्र सरकारचे आहे त्यामुळे केंद्रातील भाजपा सरकारने त्यावर निर्णय घेणे अपेक्षित आहे. राज्यात व केंद्रात काँग्रेसचे सरकार आल्यास आरक्षणाचा प्रश्न सोडवू.

मराठा समाजातील प्रतिनिधींच्या भेटीबद्दल बोलताना पटोले म्हणाले की, काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवनमध्ये मराठा समाजातील लोकांनी भेट घेतली असताना त्यांच्यासमोर पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. आता पुन्हा कोणी भेटणार असतील तर त्यांचेही स्वागत आहे. त्यांच्याशीही चर्चा करु असेही नाना पटोले म्हणाले.

लाडकी बहिण योजनेवर बोलताना नाना पटोले म्हणाले की, मध्य प्रदेशात भाजपाने लाडली बहणा ही योजना विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आणली आणि सरकार येताच ती बंद केली. तसेच महाराष्ट्रातही निवडणुकीच्या तोंडावर भाजपाप्रणित महायुती सरकारने लाडकी बहिण योजनेची घोषणा केली आहे. केवळ महिलांच्या मतांवर डोळा ठेवून ह्या योजनेची घोषणा केलेली आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या योजना काँग्रेस सरकारनेच सुरु केल्या आहेत. कर्नाटक व तेलंगणात काँग्रेस सरकारची महालक्ष्मी योजना सुरु आहे आणि महाराष्ट्रात काँग्रेस मविआचे सरकार आल्यानंतर या योजना मोठ्या प्रमाणात राबवेल.

राज्यात पूरस्थिती भयानक आहे, शेतातील पिके व लोकांची घरेही वाहून गेली आहेत, त्यांच्या निवाऱ्याची सोय नाही, अन्नधान्याची सोय नाही. सरकारने अद्याप पंचनामे करण्याचे आदेश दिलेले नाहीत. शेतकरी व पूरग्रस्त भागातील लोक सरकारी मदतीची अपेक्षा करत आहेत पण महायुती सरकारचे त्यांच्याकडे लक्ष नाही. पूरस्थितीमुळे शेतकरी कर्ज भरणा करु शकत नाही, त्यामुळे सरकारने तातडीने शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवावी. तेलंगणातील काँग्रेस सरकारप्रमाणे शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी केली पाहिजे. महायुती सरकारने कर्जमाफी केली नाही तर काँग्रेस मविआचे सरकार सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले जाईल असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## राज्यातील कार्यरत ३१०५ विशेष शिक्षकांना सेवेत सामावून घेणार

### केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** समग्र शिक्षा अभियान आणि दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत २००६ पासून सेवेत असणाऱ्या ३१०५ विशेष शिक्षकांना सामावून घेण्याचा निर्णय आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. राज्यातील केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्र्यांनी शिक्षण विभागाला दिले.

दरम्यान, २००५ पूर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेर पडताळणी करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आणि शिक्षक आमदारांचा समावेश असलेल्या समितीची स्थापना यावेळी करण्यात आली.



सह्याद्री अतिथीगृह येथे आज विशेष शिक्षक पदनिर्मिती, जुनी पेन्शन योजनेसंदर्भात बैठक झाली. यावेळी शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मंत्री सर्वश्री संजय राठोड, संजय बनसोडे, आमदार सर्वश्री अभिमन्यू पवार, आशीष जयस्वाल, प्रकाश आबीटकर, किशोर दराडे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आय. एस. चहल, शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय. एस कुंदन, आयुक्त सुरज मांढरे आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत सध्या सुमारे २ लाख ४१ हजार दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राज्यात समग्र शिक्षा योजनेंतर्गत २००६ पासून कंत्राटी तत्वावर १०२ जिल्हा समन्वयक, गट स्तरावर ८१६ विषय तज्ञ, केंद्र शाळास्तरावर १७७५ असे एकूण २६९३ विशेष शिक्षक तर दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेतर्गत प्राथमिक स्तरावरील ५४ व माध्यमिक स्तरावरील (IEDSS)- ३५८ मिळून ४१२ असे एकूण ३१०५ विशेष शिक्षक आहेत.

दिनांक १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक तालुक्याच्या केंद्र शाळेत दोन विशेष शिक्षक मंजूर असून त्याची व्याप्ती वाढवितानाच केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार सध्या कार्यरत असणाऱ्या ३१०५ विशेष शिक्षकांना सामावुन घेतले जाणार आहे. त्याच प्रमाणे गरजेप्रमाणे नविन भरती देखील करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

राज्यात २००५ पुर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या आणि २०१० पूर्वी १०० टक्के अनुदानावर असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत आजच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शिक्षक आमदार आणि संघटनांच्या प्रतिनीधींनी मते मांडली.

जुनी पेन्शन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेर पडताळणी करण्यासाठी समिती नेमण्यात आली. शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय झाला होता. त्याबाबत शिक्षण विभागाने पाठविलेल्या फाईलवर मुख्यमंत्र्यांनी बैठकीतच स्वाक्षरी केली आणि समिती स्थापन झाल्याची घोषणाही केली.

# शेतीशी निगडीत कोणत्याच उपकरणांवर जीएसटी लावू नका; खासदार प्रणिती शिंदे आक्रमक



**दौंड :** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी संसदेत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरून आवाज उठवला आहे. शेतकऱ्यांच्या उपयोगात येणाऱ्या उपकरणावरील जीएसटी टॅक्स रद्द करावा किंवा शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पंतप्रधान किसान सन्मान योजनेतील रक्कम वाढवावी, अशी मागणी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या नूतन खासदार प्रणिती शिंदे यांनी संसदेत केली आहे. तसेच कृषीमंत्र्यांना भेटून त्यांनी चर्चा करत एक निवेदनही दिले आहे.

पंतप्रधान किसान सन्मान योजना अंतर्गत शेतकऱ्यांना प्रत्येक वर्षी ६ हजार रुपये मिळतात. दरम्यान, शेतकऱ्यांना ३ हप्त्यांमध्ये दोन हजार रुपयांची रक्कम मिळते. मात्र, शेतकऱ्यांच्या टूथपेस्टचा आणि साबणाचा खर्चसुद्धा या रकमेपेक्षा जास्त असतो. शेतकऱ्यांच्या उपकरणांवर किंवा कीटकनाशकांवर ५ टक्क्यांपासून १८% पर्यंत जीएसटी लावण्यात आली आहे. त्यामुळे एखाद्या शेतकऱ्याने एक लाख रुपयांची खते खरेदी केली तर त्याला १८ हजार रुपयांचा जीएसटी सरकारला द्यावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांना ६ हजार रुपये देऊन त्यांच्या खिशातून १८ हजार रुपये वसूल केले जातात. त्यामुळे शेती संबंधित कोणत्याही वस्तूंवर टॅक्स लावू नये, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

तर काही शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेतील पैसे केवायसी अपडेट नसल्यामुळे मिळत नाहीत, अशा शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेचा लाभ मिळावा. त्याबरोबरच पिक विमा योजना मध्ये प्रत्येक पिकाला पिक विमा योजनेत विमा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तर विमा कंपनीकडून रक्कम देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी देखील खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

केंद्र सरकारवर टीका

दरम्यान प्रणिती शिंदे यांनी लोकसभा निवडणूकीपूर्वी केंद्र सरकारने केलेल्या कांदा निर्यात बंदीवरून देखील केंद्र सरकारवर टीका केली. आज देखील केंद्र सरकार आंध्रप्रदेश आणि बिहारला विशेष पॅकेज देऊन महाराष्ट्रसहीत इतर राज्यावर अन्याय केला असून भाजपला महाराष्ट्रातील झालेला पराभव पचनी पडला नसल्याचा टोल आहे त्यांनी यावेळी लगावला आहे.

# शिक्षण हक्क कायद्या नाकारणाऱ्या शाळेच्या विरोधात नागरीकांचे गेट समोर आंदोलन

## मांजरीत कल्याणी शाळेच्या गेट बाहेर पालकांचे आंदोलन



**हडपसर :** आर टि ई (RTE) -ct २००९ अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणा-या कल्याणी स्कूल मांजरी बुद्रुक या शाळेवर कडक कारवाई करण्यासाठी दि. ०५/०८/२०२४ रोजी मांजरीत शाळेच्या गेटसमोर शिक्षण हक्क आंदोलन करण्यात करण्यात आले.रिपाइं महाराष्ट्र प्रदेश युवक उपाध्यक्ष गजेंद्र मोरे यांच्या नेतृत्वात पालकांनी आंदोलन केले.

आर टि ई (RTE) -ct २००९ नुसार वेळेस प्रवेश प्रक्रियेस उशिर झाल्यावर कल्याणी स्कुल मांजरी बु CBSC बोडांच्या थातुर मातुर कारण देऊन सोशित वंचित व आर्थिक दुर्बळ घटकातिल विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुलभुत अधिकारापासून वंचित ठेवत आर टि ई कायद्या प्रमाणे २५% जागा राखिव ठेवणे बंधनकारक असताना जाणुन बुजुन विद्यार्थ्यांना व पालकांना कल्याणी शाळा प्रशासन नाहक त्रास देत आहे या शाळेची सखोल चौकशी होऊन कडक कारवाई झाली पाहिजे तसेच यात संबंधित शिक्षण अधिकारी देखिल तितकेच जबाबदार आहेत. त्यामुळे आम्ही आर टि ई कायदा अंतर्गत प्रवेश नाकारणाऱ्या व शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या कल्याणी स्कुल या शाळेवर कडक कारवाई करावी अशी मागणी पालकांनी व रिपाइं पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केली .

यावेळी गजेंद्र मोरे म्हणाले की , शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक शाळांना २५ % आरक्षित कोटा ठेवण्यात आलेला असताना आरटीई अंतर्गत अनेक शाळा प्रवेश देत नाही, गोरगरिबांच्या मुलांना शाळेची फी भरून शिक्षण घेता नाही त्यामुळे गरीब शिक्षणापासून वंचित राहातात , शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळेत प्रवेश मिळाला पाहिजे अन्यथा शाळे.विरोधात आंदोलन उभारण्यात येईल असे मोरे म्हणाले.

# सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने स्पर्धा

**मुंबई :** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुररस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. राज्यातील अधिकाधिक मंडळांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

राज्यात गणेश उत्सवास दिनांक ७ सप्टेंबर रोजी सुरुवात होत आहे. राज्य समितीकडे जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ आणि अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशींमधून गुणांकन आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची निवड केली जाणार आहे. वरील प्रमाणे तीन विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ारर्हीरीं.श्रिवरसारळश्र.लो या ई- मेल आयडीवर ३१ ऑगस्टपूर्वी परिपूर्ण अर्ज सादर करावेत.

या पुरस्कारांसाठी निवड होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी विविध निकष असतील. त्यांना गुण दिले जातील. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल, असे मंत्री मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

या स्पर्धेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन संवर्धन, राज्यातील गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय/राज्य स्मारके, धार्मिक स्थळांविषयी जनजागृती, जतन व संवर्धन, सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट (थर्मोकोल, प्लास्टिक विरहीत), ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, पारंपरिक/ देशी खेळांच्या स्पर्धा आणि गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा आदी बाबींवर गणेशोत्सव मंडळांना गुणांकन दिले जाणार आहेत.

विजेत्यांच्या निवडीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी या समितीचा अध्यक्ष असेल. याशिवाय या समितीत शासकीय कला महाविद्यालयातील कला प्राध्यापक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, आरोग्य अधिकारी, पोलिस अधिकारी सदस्य

# गिरणी कामगार व वारसांचे आमरण उपोषण

**मुंबई :** मुंबईतील गिरणी कामगारांच्या अस्तित्वाच्या प्रलंबित मागण्यासाठी गिरणी कामगार व त्यांचे वारस ९ ऑगस्ट रोजी आमरण उपोषण करणार असल्याची माहिती माजी उपमहापौर बाबूभाई भवानजी यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

भारतमाता लालबाग मुंबई येथे दुपारी १.०० वाजता हजारो गिरणी कामगार व त्यांचे वारस आमरण उपोषण, मागण्या मान्य होईपर्यत करणार आहेत. जेष्ठ सामाज सेविका मेधा पाटकर, संजय गोपाळ, जगदीश खैरालिया उपस्थित राहाणार आहेत. या उपोषणाला गिरणी कामगार एकजुट च्या सात संघटनांनी पाठींबा देण्याचे निश्चित केले आहे असे हेमंत गोसावी यांनी सांगितले.

मराठी गिरणी कामगारांनी मुंबईचा विकास केला त्यांच्या मागण्या योग्य असून मुंबईतच हक्काची मोफत घरे मिळालीच पाहीजेत यासाठी ४२ वर्ष लढा सुरू आहे.

महाराष्ट्रातील लाखो मराठी तरुणांचा मुंबईतील कायमचा रोजगार शासनाच्या मालक धार्जिनी धोरणामुळे उध्वस्त केला गेला आहे. याला सर्वस्वी शासन व भ्रष्ट राजकीय व्यवस्थाच कारणीभूत आहे. गेले ४२ वर्षे गिरणी कामगार आपल्या मुंबईतील अस्तित्वासाठी डोळ्यात प्राण आनुन न्यायाच्या प्रतिक्षित आहे. मला न्याय कधी मिळणार ? याचा विचार करत आहे. असे समन्वयक रमाकांत बने यांनी सांगितले.

समन्वय समितीचे हेमंत गोसावी, अरविंद घाग, विवेकानंद बेलुसे, हणुमंत निकम, संभाजी नलगे, अशोक रेवळे, लक्ष्मिकांत पाटिल, सिद्धार्थ चव्हाण, नथुराम सराटे,हरिशचंद्र करगळ. जिते आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



# पंढरीतील पुराचा धोका टळला; पाणी ओसरु लागले

**पंढरपूर :** येथील भीमा नदीच्या पात्रात पाण्याची आवक हजारावर आली आहे. बुधवारी दुपारी तीन वाजता भीमा नदीत ८९ हजार क्युसेक पाणी वाहत आहे. विशेष म्हणजे धोक्याच्या पातळीपेक्षा पाण्याची पातळी कमी झाली आहे. उजनी धरणातून दुपारी तीन वाजता ४० हजार क्युसेक पाणी भीमा नदीत सोडण्यात आले. तर वीर धरणातून ५८०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. भीमा नदीत येणारी आवक घटत चालली असून पाण्याची पातळी कमी होत आहे. अद्याप वाळवंटातील सर्व मंदिरे व घाट पाण्याखाली आहेत. पूरग्रस्त भागातील पाणी ओसरल्यानंतर त्या ठिकाणची स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने कामे त्वरित सुरू केल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली आहे.

गेली दोन दिवस पुण्यातील पावसाचा जोर कमी झाला. त्यामुळे पुण्यातून येणारी पाण्याची आवक कमी झाली. परिणामी येथील भीमा नदीच्या पात्रातील पाणी कमी झाले. मात्र दुसरीकडे उजनी धरण १०७ टक्के भरले आहे. त्यामुळे उजनीतून भीमा नदीत पाणी सोडले जात आहे. या आधी उजनीतून लाखो क्युसेक पाणी सोडले जात होते. ते आता बुधवारी दुपारी ३ वाजता ४० हजार क्युसेकने सोडण्यात आले आहे. तर दुसरीकडे वीर धरणातून पुन्हा पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. वीर धरणातून ५८०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. भीमा नदीत दुपारी ३ वाजता ८९ हजार क्युसेकने पाणी वाहत आहे. पाणी उतरण्याचा वेग कमी आहे.

शहरातील नदीकाठच्या झोपडपट्टीत शिरलेले पाणी ओसरू लागले आहे. पालिकेने तातडीने त्या ठिकाणी साठलेला गाळ, कचरा उचलण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच 'डीडीटी पावडर', फवारणी सुरू केल्याची माहिती पालिकेचे उप मुख्याधिकारी ड. सुनील वाळूजकर यांनी दिली आहे. सद्यपरिस्थितीत भीमा नदीची धोक्याच्या पातळीपेक्षा कमी पाण्याची पातळी झाली आहे. त्यामुळे पुराचा धोका टळला असला तरी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अतिक्रमणाबाबत पालिकेची केली गोची

**सातारा :** गोडोलीतील साईबाबा चौकातील अतिक्रमणावर कारवाई करण्यासाठी पालिकेला निवेदन देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला कोणती अतिक्रमणे काढणे अपेक्षित आहे, त्याचा नकाशावर दर्शवून पुरावे सादर करण्यासाठी गृहपाठ दिला याच कार्यकर्त्यांने पालिकेच्या अधिकाऱ्यांचा कायद्याच्या अभ्यास कच्चा असून कलम १८२ ची अवलोकन करूनच कारवाई करा. अन्यथा कर्तव्यात कसूर होईल आणि शिस्त भंग कारवाई होईल असे उत्तर देऊन चांगलीच गोची केली आहे. आता अतिक्रमण काढण्यासाठी अजय पार्टे यांची गांधीगिरी आंदोलन नव्या वळणाकडे सरकले.

साईबाबा मंदिर चौक गोडोली येथे अतिक्रमण मुळे वाहतूक कोंडी होते यासाठी येथील अतिक्रमणे काढणे बाबत दिनांक ५ जुलै ला निवेदन दिले होते. त्यावर ३० जुलै ला पालिकेने पत्राने अतिक्रमण नकाशावर दर्शवून सर्व्हे नंबर सह पुरावे सादर करण्यास सांगितले. यावर अजय पार्टे यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १८२ मध्ये नगरपरिषदेने रहदारीस अडथळा निर्माण होत असेल , होण्याचा संभव असेल अशी अतिक्रमणे अंशतः किंवा पुर्ण:ता काढून टाकण्याचे कायद्यात फर्माविता येईल, अशी तरतूद आहे. याच कायद्यात कलम ४९ मध्ये सर्व्हेक्षण करणे हे नगरपरिषद चे कर्तव्य असेल, अशी ही तरतूद आहे. कायद्याचा अभ्यास कच्चा असणारे ऐतिहासिक साताऱ्याच्या पालिकेत नियुक्त असल्याचे दुर्दैवी असून अधिकारी, कर्मचाऱ्यांना आपल्या कर्तृत्वाची, जबाबदारीची जाणीव नाही की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यासाठी पत्र दिले आहे, हे समजले नाही.

सातारा पालिकेच्या प्रशासनकडून साईबाबा चौकातील वाहतूक कोंडीचा नाहक त्रास सहन करावा लागणाऱ्या नागरिकांना अतिक्रमणावर कारवाई केली जात नसल्याने पालिकेच्या कामकाज आणि भुमिकेवर संभ्रम निर्माण झाला आहे. तो दूर करण्यासाठी नगरपरिषद कायदा तरतूदनुसार रस्त्यावरील वाहतुकीसाठी अडथळा ठरणारी अतिक्रमणावर त्वरित कार्यवाही करावी, अशी पुन्हा सामाजिक कार्यकर्ते अजय पार्टे ऋषिकेश भोसले, सचिन शिंदे,अमोल खुडे, रणजित संकपाळ, आशिष

# अजिंक्यतारा कारखाना किफायतशीर दर देण्यासाठी कटीबध्द : आ. शिवेंद्रसिंहराजे

## कारखाना कार्यस्थळावर रोलर पूजन उत्साहात

**सातारा :** ऊस उत्पादक शेतकरी केंद्रबिंदू मानून अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना गाळपास येणार्या ऊसला उच्चतम दर देत आहे. सभासद शेतकर्यांच्या ऊसाला चांगला दर मिळावा आणि त्यांचे आर्थिक जीवनमान उंचवावे, हे स्व. भाऊसाहेब महाराजांचे स्वप्न कारखाना व्यवस्थापनाकडून सत्यात उतरवले आहे. नेहमीप्रमाणे उच्चतम दर देण्याची परंपरा कायम ठेवत अजिंक्यतारा कारखाना होवू घातलेल्या हंगामात गाळपास येणार्या ऊसाला किफायतशीर दर देण्यासाठी कटीबध्द आहे, असे आश्वासक प्रतिपादन कारखान्याचे मार्गदर्शक संचालक आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२०२५ च्या गळीत हंगामाकरिता यंत्रसामुग्री देखभाल, दुरुस्ती आदी कामे प्रगतीपथावर असून गळीत हंगामाची पूर्व तयारी म्हणून मशिनरी विभागाकडील मिलमधील पहिल्या रोलर पूजनप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी कारखान्याचे चेअरमन यशवंत साळुंखे, व्हा. चेअरमन नामदेव सावंत, संचालक मंडळाचे सर्व सदस्य, कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते यांच्यासह कारखान्यातील अधिकारी व कामगार-कर्मचारी उपस्थित होते.

होवू घातलेल्या गळीत हंगामात उच्चतम साखर उतारा व कमीत कमी दिवसात जास्तीत जास्त साखरेचे उत्पादन घेणे तसेच उपपदार्थांच्या उत्पादनावर भर दिला जाणार आहे. प्रत्येक गाळप हंगाम सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या संपन्न करून १००% एफआरपी रक्कम शेतकर्यांना वेळेत आदा केली जात आहे. गाळपास आलेल्या ऊसाचे संपूर्ण पेमेंट वेळेत आदा केले असल्यामुळे ऊस उत्पादक, सभासद, बिगर सभासदांमध्ये अजिंक्यतारा कारखान्याबाबत समाधान असून अजिंक्यतारा परिवारामध्ये आनंदाचे वातावरण आहे, असे आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले.



यावेळी जेष्ठ संचालक रामचंद्र जगदाळे, लालासाहेब पवार, सर्जेराव सावंत, जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या माजी सभापती वनिता गोरे, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका कांचन साळुंखे, पंचायत समितीच्या माजी सभापती सरिता इंदलकर, धर्मराज घोरपडे, मिलिंद कदम, राहुल शिंदे, दादा शेळके, अरविंद चव्हाण, विक्रम पवार, अजिंक्यतारा सूत गिरणीचे अध्यक्ष उत्तमराव नावडकर, उपाध्यक्ष जालिंदर महाडिक, संचालक अजित साळुंखे, गणपत मोहिते, पदमसिंह फडतरे, अरुण कापसे, कृष्णा धनवे, सयाजी कदम यांच्यासह सातारा आणि जावली तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फलटण विधानसभा बहुजन मुक्ती पार्टी ताकदीने लढवणार : तुषार मोतलिंग

**सातारा :** समाजामध्ये होणार्या अन्यायाविरोधात नेहमीच एल्गार पुकारणारी बहुजन मुक्ती पार्टी आगामी काळात फलटण विधानसभा ताकदीने लढवणार असल्याचे प्रतिपादन बहुजन मुक्ती पार्टीच्या पश्चिम महाराष्ट्राचे प्रभारी तुषार मोतलिंग यांनी केले आहे. याचबरोबर जिल्हा परिषदेत बोकाळलेल्या भ्रष्टाचाराविरोधात दि. १६ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेत बेमुदत ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

सातारा शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत त्यांनी वरील प्रतिपादन केले. या बैठकीवेळी बहुजन मुक्ती पार्टीमध्ये ज्योस्त्ना सरतापे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. त्याबद्दल त्यांची महिला सातारा जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. याचवेळी वाई मधील संदीप कांबळे यांची युवा आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड झाली तसेच कैलास पवार यांची सातारा जिल्हा उपाध्यक्ष व सुनील कांबळे यांची महाबळेश्वर तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना तुषार मोतलिंग यांनी सांगितले की, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जी भरती केली होती, त्यामध्ये ओबीसी, एससी, एसटी चा कोटा बिंदू नामावली प्रमाणे न भरता पैसे घेऊन मनमानी पद्धतीने भरती केलेली आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पीओपी मूर्तीबाबत उच्च न्यायालयात याचिका

## बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी

**सातारा :** राज्य शासनाकडून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बंदीबाबत केवळ दिखावा केला जात असून, कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. परिणामी पर्यावरणप्रेमी गणेशमूर्तिकार देशोधडीला लागले आहेत. याप्रकरणी राज्यासह सातारा जिल्ह्यातील मूर्तिकारांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे, अशी माहिती श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला संस्थेचे मारुती कुंभार यांनी दिली.



महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा करण्याच्या पद्धतींमध्ये काही विकृती निर्माण झाल्या आहेत. याची सुरुवात गणेशमूर्तींच्या निर्मितीपासून होते. केंद्रीय प्रदूषण नियामक मंडळाने १२ मे २०20 पासून देशभरात प्रदूषणकारी प्लास्टर ऑफ पॅरीसपासून मूर्तींचे उत्पादन, साठवणूक, विक्री, आदींवर बंदी घातलेली आहे. सर्वोच्च न्यायालयानेही २०२१ साली ही बंदी कायम केली असताना, आजही बाजारात विक्रीस उपलब्ध असणाऱ्या ९० टक्के मूर्ती या प्लास्टर ऑफ पॅरिस निर्मित आहेत. पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्तींबाबत गेली दोन दशके पर्यावरण संस्था सातत्याने समाज प्रबोधन करत आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे आज ग्राहक सजग झाला असून, मातीच्या मूर्तींबाबत आग्रही आहे; परंतु बाजारात गेल्यावर ग्राहकाकडे प्लास्टर ऑफ पॅरिसचाच पर्याय उपलब्ध आहे.

**याचिकेत या प्रमुख मागण्या**

**प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बंदीची तंतोतंत अंमलबजावणी करणे, नियम मोडणाऱ्या मूर्तिकार, विक्रेते यांच्यावर अजामीनपात्र गुन्हे दाखल करणे, जिल्हास्तरीय समित्या नेमून त्यांच्यामार्फत अंमलबजावणीची देखरेख ठेवणे अशा प्रमुख मागण्या या याचिकेत केल्या आहेत. दि. ३१ जुलै रोजी याचिकेची प्रथम सुनावणी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय यांच्यासमोर झाली असून, याचिकाकर्त्यांचे म्हणणे गांभीर्यपूर्वक ऐकून सर्व प्रतिवादींना त्यांचे म्हणणे तीन आठवड्यांत सादर करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती मारुती कुंभार यांनी दिली.**

दरवर्षी गणेशोत्सवजवळ येताच राज्य सरकार पीओपी बंदीबाबत केवळ दिखावा करत असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात नाही. राज्य सरकारच्या उदासीनतेमुळे आज पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती बनविणारे पारंपरिक मूर्तिकार देशोधडीला लागले असून, जलीय जैवविविधता प्रचंड वेगाने उद्ध्वस्त होते आहे. या सर्व मुद्द्यांबाबत राज्यातील विविध जिल्ह्यांतील पर्यावरण कार्यकर्ते व पारंपरिक मूर्तिकारांनी एकत्र येत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.



अटक केलेल्या संशयितासमवेत पोलीस पथक.

# जेसीबी खरेदी प्रकरणातील भामट्याला कोल्हापूरमध्ये अटक

## जेसीबी बार्शी येथे विकला गेल्याचे तपासात स्पष्ट

**सातारा :** बनावट एनईएफटी केल्याचे भासवत साताऱ्यातील जेसीबी मालकाला ३० लाखाचा गंडा घालणाऱ्या अभिजीत मोहन घोरपडे, वय २९ रा. निमसाखर, ता. इंदापूर, जि. पुणे या भामट्याला कोल्हापुर येथून अटक करण्यात आली आहे. सातारा शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने ही कारवाई केली. फिर्यादीच्या मालकीचा जेसीबी त्याने नोटरी कागदपत्राद्वारे ताब्यात घेतला होता, तो बार्शी येथे परस्पर विकल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे

याबाबतची अधिक माहिती अशी माजिद फारुक शेख ,रा. गुरुवार पेठ सातारा यांनी आर्थिक अडचणीमुळे टाटा कंपनीचा हिताची मॉडेलचा जेसीबी विकण्याची जाहिरात फेसबुकवर दिली होती. ती जाहिरात पाहून घोरपडे याने शेख यांच्याशी संपर्क करून मशीन नोटरी करून हप्ते भरतो असे सांगितले आणि ऑनलाईन एनईएफटीचा बनाव केला. संबंधित फायनान्स कंपनीने ही एनईएफटी बनावट असल्याचे सांगत पुढील हप्ते भरण्यास शेख यांना सांगितले. तेव्हा शेख यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.शेख यांनी तातडीने सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या सूचनेप्रमाणे सातारा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांच्या सूचनेप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने कसून चौकशी सुरू केली. अभिजीत घोरपडे हा कोल्हापूर या ठिकाणी जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर सातारा पोलिसांनी घोरपडेला कोल्हापूर येथे जाऊन अटक केली.

याप्रकरणी कोर्टाने संशयिताला चार दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. घोरपडे हा अटल गुन्हेगार असून त्याच्यावर सांगली, पुणे, बारामती अशा ठिकाणी फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. हा भामटा अत्यंत सराईत होता. जेसीबी त्याने कोठे ठेवला याचा ठाव ठिकाण सांगत नव्हता अधिक चौकशी अंतिम घोरपडे यांनी संबंधित जेसीबी बार्शी या ठिकाणी विक्री केल्याचे सांगितले.पोलिसांनी घटनास्थळी जाऊन परस्पर विक्री केलेला जेसीबी ताब्यात घेतला. घोरपडे यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. पोलीस निरीक्षक सचिन म्हेत्रे, पोलीस उपनिरीक्षक सुधीर मोरे, निलेश यादव, सुजित भोसले, सुनील मोहिते, पंकज मोहिते, विक्रम माने, इरफान मुलाणी, संतोष घाडगे, विशाल धुमाळ यांनी तपासात भाग घेतला होता.

# विट्यात धारदार शस्त्राने भोसकून तरूणाचा खून

**विटा,** : येथे विटा-मायणी रस्त्यालगत असणा-या एका वाईन शॉपजवळ धारदार शस्त्राने भोसकून एका तरूणाचा खून करण्यात आला. प्रितम उर्फ चिक्या संजीव भिंगारदेवे (वय २७, विटा, ता. खानापूर, जि. सांगली) असे खून झालेल्या तरूणाचे नांव आहे. खून करणाऱ्या संशयित संदीप ऊर्फ तात्यासो पवार (वय ४४, रा. नेवरी रोड, विटा ता. खानापूर) यास ताब्यात घेतल्याचे पोलिसांनी सांगितले.



प्रीतम भिंगारदेवे (मयत)



(संशयित आरोपी)

हा खून दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास झाला. दारूच्या नशेत खून झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. गीता प्रीतम भिंगारदेवे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, विटा येथे मायणी रस्त्यालगत एक वाईन शॉप आहे. तेथे प्रीतम ऊर्फ चिक्या भिंगारदेवे व संदीप उर्फ तात्यासाहेब पवार यांच्यात दारु पिण्याच्या कारणावरुन बाचाबाची झाली. बाचाबाची रुपांतर भांडणात झाले. संदीप याने मोटार सायकल अडकवलेल्या पिशवीतून चाकू काढून पोटात भोकासले. प्रीतम रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. भिंगारदेवे यास उपचारासाठी विटा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे भिंगारदेवे याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. खूनाची माहिती मिळताच ग्रामीण रुग्णालय परिसरात भिंगारदेवे याच्या नातेवाईकांनी गर्दी केली होती. आरोपी संदीप पवार यास पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

## सातारा-कोल्हापूर विशेष रेल्वे धावणार

**सांगली, दि. ५ (वृत्तसंस्था)**

ान नरेंद्र मोदी यांच्याकडे केलेल्या तक्रारीनंतर रेल्वे प्रशासन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे आले आहे. बुधवारी ७ ऑगस्टपासून १३ ऑगस्टपर्यंत सातारा-सांगली-कोल्हापूर विशेष रेल्वेगाडी दररोज धावणार आहे.

सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात पुराच्या काळात सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील अनेक गावांतील एसटीच्या फेऱ्या रद्द झाल्या.

## रस्त्याची 'वाट'; सार्वजनिक बांधकामची तिघा ठेकेदारांना नोटीस

**सातारा :** पावसाळा सुरू झाल्यानंतर अनेक रस्त्यांची वाट लागलेली आहे. पावसाळ्यापूर्वी झालेल्या रस्त्यावरही मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे अपघात घडत आहेत. त्यातच रस्त्यांबाबत पालकमंत्रीही आक्रमक झाले आहेत. यामुळे संबंधित यंत्रणाही कामाला लागली आहे. तसेच आता सार्वजनिक बांधकाम विभागानेही तिघां ठेकेदारांना नोटीस काढून रस्ते दुरुस्तीबाबत फतवा काढला आहे. त्यामुळे आतातरी रस्ता कामाचा दर्जा सुधारावा, अशी मागणी नागिरकांतून होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे दोन विभाग आहेत. पश्चिम विभागात कऱ्हाड, पाटण, महाबळेश्वर, जावळी आणि वाई हे तालुके येतात. तर पूर्व विभागात माण, खटाव, फलटण, खंडाळा, कोरेगाव, सातारा असे सहा तालुके समाविष्ट आहेत. पावसाळ्यात रस्त्याची वाट लागल्यानंतर बांधकाम विभागाने महाबळेश्वर तालुक्यातील एका ठेकेदाराला नोटीस काढली आहे. संबंधिताला तत्परतेने काम केलेल्या रस्त्यावरील खड्डे भरण्यास सांगितले आहे. तर सातारा तालुक्यातीलही दोन ठेकेदारांना रस्त्याबद्दल नोटीस काढण्यात आलेली आहे. तरीही जिल्ह्यातील अनेक रस्त्यांची वाट लागली असल्याने जे-जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.


## सातारा-कोल्हापूर डेमू पॅसेंजर कोरेगावजवळ पडली बंद

**सातारा :** सातारा-कोल्हापूर पॅसेंजरचे इंजिन बंद पडल्याने सोमवारी सकाळी चार तास उशिरा कोल्हापुरात पोहोचली. त्यामुळे आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेकडो नोकरदारांना कामावर हाफ डे टाकावा लागला. महिला कामगारांनी अर्ध्या तिकिटात एसटीने प्रवास करून कोल्हापूर गाठले. रेल्वेच्याअनागोंदी कारभारामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

सातारा ते कोल्हापूर डेमू पॅसेंजरच्या इंजिनातील मोटर बंद पडली. त्यामुळे गाडी रहिमतपूर ते कोरेगावदरम्यान अडकून पडली.

# सातारा जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला

**सातारा :** जिल्ह्याच्या पश्चिम भागासह प्रमुख धरण क्षेत्रातही पावसाचा जोर ओसरला आहे. यामुळे कण्हेर, उरमोडीच्या दरवाजातील विसर्ग थांबविण्यात आला आहे. तर मंगळवारी १२ दिवसानंतर कोयना धरणाचे दरवाजेही बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे सध्या धरणाच्या पायथा वीजगृहातूनच २ हजार १00 क्यूसेक विसर्ग सुरू आहे. तर २४ तासांत सर्वाधिक पर्जन्यमानाची नोंद नवजाला ९४ मिलिमीटर झाली आहे.



जिल्ह्यात जून महिन्याच्या सुरूवातीलाच पावसाला सुरूवात झाली होती. पण, जूनमध्ये मोठ्या प्रमाणात पर्जन्यमान झाले नाही. मात्र, जुलै महिना उजाडल्यानंतर पावसाने थैमान घातले. जुलैच्या पहिल्या आठवड्यात सुरू झालेला पाऊस ऑगस्ट महिना उजाडेपर्यंत सुरू होता. यामध्ये जुलैच्या मध्यावर सलग १० दिवस पश्चिम भागात पावसाने धुमाकूळ घातला. यामुळे दरडी कोसळल्या, ओढे-नाल्यांना पूर आले. यामध्ये काहींना आपला जीवही गमवावा लागला. परिणामी पश्चिम भागातील जनजीवन विस्कळीत झाले होते. तसेच धरणांतील पाणीसाठाही वेगाने वाढला. यामुळे पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी विसर्ग सुरू करावा लागलेला. मात्र, मागील आठवड्यापासून पावसाचा जोर कमी झाला आहे. त्यामुळे प्रमुख धरणांत येणाऱ्या पाण्याची आवक कमी झाली आहे. आता धरणे भरुन घेण्यासाठी अनेक धरणांतील विसर्ग थांबविण्यात आला आहे. तर काही धरणांतून आवक पाहून अल्प प्रमाणात पाणी सोडले जात आहे.

मंगळवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत कोयनानगर येथे फक्त २५ मिलिमीटर पर्जन्यमानाची नोंद झालेली आहे. तर नवजा येथे ९४ आणि महाबळेश्वरला २१ मिलिमीटरपाऊसझालेला आहे. एक जूनपासूनचा विचार करता नवजा येथे सर्वाधिक ४ हजार ८00 मिलिमीटर पर्जन्यमान झाले. त्यानंतर महाबळेश्वरला ४ हजार ५९२ आणि कोयनानगर येथे ४ हजार १४६ मिलिमीटर पाऊस झालेला आहे. तर पश्चिम भागातीलच धोम, बलकवडी, तारळी, कण्हेर, उरमोडी या प्रमुख धरणक्षेत्रातही पावसाचा जोर कमी झालेला आहे. त्यामुळे आवकही कमी प्रमाणात होत आहे. २५ जुलैला दरवाजे प्रथम उघडले.

### कोयनेचे दरवाजे १२ दिवसानंतर बंद

# रस्ता वाहतुकी योग्य झाला नाहीतर महामार्गाला जेसीबी लावणार

## पाटण ते संगमनगर रस्त्याच्या दुरावस्था विरोधात रास्ता रोको

**पाटण :** गुहागर-विजापुर महामार्गावरील संगमनगर ते पाटण रस्त्याच्या दुरावस्थे विरोधात मंगळवार दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३0 वाजता संगमनगर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

पंचायत समितीचे माजी सदस्य बबनराव कांबळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या रास्तारोको आंदोलनात राजाभाऊ शेलार, बाळासाहेब कदम, पंकज गुरव, सत्यजित शेलार, संपत जाधव आदींनी उपस्थित राहुन रस्त्याबाबत तीव्र भावना व्यक्त केल्या. यावेळी आंदोलनकर्त्यांनी महामार्ग विभागाला रस्ता वाहतुकीस योग्य करण्यासाठी दि ४ सप्टेंबर म्हणजे गणपती आगमनापुर्वीची मुदत दिली असुन या मुदतीत रस्त्याचे खड्डे मुजवुन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली नाही तर महामार्गाला जेसीबी लावण्याचा इशारा उपस्थित आंदोलकांनी दिला आहे.



**संगमनगर : रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात आंदोलन करताना बबनराव कांबळे, राजाभाऊ शेलार, बाळासाहेब कदम, पंकज गुरव व इतर.**

यावेळी बबनराव कांबळे म्हणाले, आंदोलनाची घोषणा केली की खड्डे भरण्याची लगभग सुरू होते. महामार्ग विभाग व ठेकेदारांनी यापुर्वीच रस्त्याची जबाबदारी घेतली असती तर आम्हावर आंदोलनाची वेळ आली नसती. यापुढे महामार्ग खड्डे मुक्त झाला नाहीतरी पुन्हा मोठे आंदोलन उभारले जाईल. राजाभाऊ शेलार म्हणाले, यापुर्वी अनेक आंदोलन बैठका झाल्या. मात्र, रस्त्याची स्थिती बदलत नाही याचा अर्थ कोयना भागातील लोकांवर जाणुनबुजुन अन्याय केला जात आहे. आज प्रशासनाने केलेल्या आवाहनानुसार आंदोलन मागे घेतले असले तरी यापुढे आमच्यावर गुन्हे दाखल केले तरी माघार घेणार नाही.

**गाजर दाखवत निषेध**

**गेली आठ वर्ष महामार्ग विभागाने जनतेला आश्वासनाचे गाजर दाखवत रस्ताची दुरावस्था केल्याच्या निषेधार्थ आंदोलकांनी गाजर दाखवत महामार्ग विभागाचा निषेध व्यक्त केला.**

आंदोलनस्थळी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सहाय्यक अभियंता पुजा परदेशी, कनिष्ठ अभियंता मणेर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप शितोळे, मंडलाधिकारी संजय जंगम, तलाठी शशिकांत बोबडे, निलेश भाग्यवंत आदी उपस्थित होते. कोयना पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप शितोळे यांनी मोठ्या संख्येने पोलीस बदोबस्त तैनात केला होता. अर्धा तास चाललेल्या आंदोलनामूळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी आदोलनस्थळी महामार्ग विभागाचे सहाय्यक अभियंता पुजा परदेशी यानी संगमनगर ते पाटण या १३ किमी रस्ताचा खड्डे भरण्याचे काम सातत्याने सुरू असुन पावसामुळे डांबराने खड्डे भरता आले नाहीत तसेच नविन रस्त्याच्या कामासाठी ठेकेदार आवश्यक मशिनरी पंधरा दिवसात आणणार असुन महिनाभरात शासकीय प्रकिया पुर्ण झाली की प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे आश्वासन देत आंदोलन मागे घेण्याची पत्राव्दारे विनंती केल्यानंतर रास्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित झाले. बाळासाहेब कदम म्हणाले, पावसामुळे डांबराने खड्डे भरता आले नाही असे म्हणणे चुकीचे असुन दरवर्षी या भागात पावसाचे अधिक प्रमाण असतो हे महामार्ग विभागाला ठाऊक नाही का? या आंदोलनात कोयना भागातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कोयना भागातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पत्रे उचकटून १ लाख ९७ हजार रुपयांच्या साहित्याची चोरी

### अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**फलटण :** फलटण-पुसेगाव राज्य मार्गावरील वाठार निंबाळकर, ता. फलटण गावच्या हद्दीतील वाठार फाटा येथील श्री. बाबा सुपर बझारचे पत्रे उचकटून तेथील १ लाख ९७ हजार १७0 रुपयांचे विविध प्रकारचे साहित्य अज्ञाताने चोरुन नेले.

याबाबत पोलिस ठाण्यातून देण्यात आलेल्या माहितीनुसार, फलटण-पुसेगाव राज्य मार्गावर वाठार फाटा येथे हणमंतराव सरक व आश्विन दोशी यांच्या मालकीचा श्री. बाबा सुपर बझार आहे. दि. ३ ऑगस्ट रोजी रात्री ९ नंतर व दि. ४ ऑगस्ट सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने बझारच्या पत्र्याच्या शेडचे पत्रे उचकटून आतमध्ये प्रवेश करुन तेथील काजू, बदामाचे पॅकिंग, तूप, पोहे, खोबरे, शेंगदाणे, चहा, डाळी, तांदूळ, साखर, तेल डबे व पॅकिंग, खोबरेल तेल, साबण, बिस्किटे, इलेक्ट्रिक साहित्य, कोल्डड्रिंकच्या बाटल्या असे किराणा मालाचे व अन्य विविध प्रकारचे सुट्टे व पॅकिंगमधील सुमारे १ लाख ९७ हजार १७0 रुपये किमतीचे साहित्य चोरुन नेले आहे. याबाबत हणमंतराव सरक यांनी फलटण ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## विशाळगड अतिक्रमण मुक्ती आंदोलन प्रकरणी १७ जणांना जामीन मंजूर

**कोल्हापूर :** विशाळगड अतिक्रमण मुक्ती आंदोलनावेळी झालेल्या हिंसाचार प्रकरणी जिल्हा न्यायालयाने आज (दि.६) १७ जणांना तब्बल तीन आठवड्यानंतर सशर्त जामीन मंजूर केला. तर सात जणांचा जामीन फेटाळण्यात आला आहे.

१४ जुलै रोजी माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या विशाळगड अतिक्रमणमुक्ती मोहिमेला हिंसक वळण लागलं. यावेळी गजापूर, विशाळगड परिसरात घरे, दुकानांसह मशिदीला लक्ष्य करत प्रचंड दगडफेक, तोडफोड करण्यात आली होती. या प्रकरणी शाहूवाडी पोलिसांनी एकूण पाच गुन्हे नोंदवले होते. तर २४ जणांना अटक करण्यात आली होती. यातील १७ जणांना आज न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केलाय. यावेळी न्यायालय परिसरात पोलिसांचा मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शिवभक्तांची देखील मोठी गर्दी झाली होती.

# बारामतीमध्ये विधानसभेची तयारी सुरु

## बुथ कमिटींच्या पुनर्गठनाची जबाबदारी किरण गुजर सांभाळणार



**बारामती :** राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूकीचे बिगुल वाजणार आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. महायुतीसह महाविकास आघाडीमधील घटक पक्ष जोरदार तयारी करत आहेत. बारामतीमध्ये लोकसभेप्रमाणे विधानसभेची जोरदार तयारी सुरु आहे. यंदाची विधानसभा रंगणार असून अजित पवार यांनी कामाला सुरुवात देखील केले आहे. बारामती विधानसभा मतदारसंघात देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आगामी निवडणुकीच्या दृष्टीने मोर्चेबधणी सुरू केली आहे.

ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बारामती विधानसभा मतदार संघामधील सर्व मतदानकेंद्रासाठी स्थानिक कार्यकर्त्यांच्या बुथ कमिट्या स्थापन करण्याची जबाबदारी ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर यांच्यावर देण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विश्वासाने सोपविली आहे.

याबाबत सर्वच बुथकमिट्यांचे पुनर्नियोजन केले जाणार असून बारामती तालुका शहरामधील प्रत्येक गाव प्रभागामध्ये जाऊन तेथील जेष्ठ युवक महिला युवती कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष बोलून, त्यांची मते समजावून घेऊन पूर्वीच्या बुथकमिट्यांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व जे या कामापासून बाजूला आहेत त्यांना बरोबर घेऊन बुथ कमिट्यांची पुनर्बांधणी करणार असल्याची माहिती किरण गुजर यांनी दिली. दि ९ ऑगस्ट क्रांतीदिनाचे औचित्य साधून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणार असल्याचे त्यांनी सांगितले, तसेच बुथकमिट्या स्थापणेनंतर त्याची पुढील जबाबदारी कामकाज व विधानसभा निवडणुकी पर्यंतचे नियोजन करीत असल्याचेही गुजर यांनी नमूद केले आहे.

# रोहित पवारांना मविआतूनच विरोध; कर्जत-जामखेडमध्ये फडकणार बंडाचे निशाण?

**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभेचे पडघम वाजू लागले आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची तयारी करताना दिसत आहे. राज्यात मविआ आणि महायुती यांच्यातच थेट सामना आहे. मात्र, पक्ष फ टीनंतर राज्यातील सर्वच मतदारसंघातील राजकिय गणितं बदलली आहेत. त्यातच मविआत सर्वकाही आलबेल असल्याचे वाटत असले तरी अनेक मतदारसंघात मविआमध्येही संघर्ष पाहायला मिळत आहे. अहमदनगरच्या कर्जत-जामखेड मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे रोहित पवार सध्या आमदार असताना काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दोन्ही



### विद्यमान आमदार राष्ट्रवादीचा - फाळके

**विधानसभा निवडणुकीत कुठला मतदारसंघ कोणत्या पक्षाकडे जाईल हे अजून पक्षश्रेष्ठीकडून ठरायचं आहे. अशात प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांना आपल्या पक्षाला जागा मिळावी अशी मागणी करण्याचा हक्क आहे. मात्र, जिल्ह्यात राष्ट्रवादीची ताकद मोठी आहे, या मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचा आमदार आहे आणि नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही जिल्ह्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला यश मिळालं आहे. त्यामुळे कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघात जागा आम्हालाच मिळेल, अशी खात्री राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून व्यक्त केली जात आहे. सोबतच राष्ट्रवादीचा विद्यमान आमदार असताना देखील जागा मागण चुकीचं असल्याचे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी म्हंटले आहे.**

पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून विधानसभेची जागा आपल्या पक्षाला मिळावी यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यामुळे, रोहित पवारांच्या मतदारसंघांतही बंडाणे निशाण फडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आगामी विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत, त्यात कुठला मतदारसंघ कुठल्या पक्षाला हे अजून निश्चित झालेलं नाही. मात्र, कार्यकर्त्यांकडून आपल्याच पक्षाला विधानसभेची जागा मिळावी, आपल्या माणसाला तिकीट मिळावं, यासाठी मोर्चेबांधणी सुरू आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार हे कर्जत जामखेड मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. येथून गतवेळेस त्यांनी भाजपच्या राम शिंदे यांचा पराभव करुन विधानसभा गाठली होती. मात्र, यंदा महाविकास आघाडीतून हा मतदारसंघ आपल्याला मिळावा यासाठी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते बैठका घेत आहेत. त्यामुळे, या दोन्ही पक्षांकडून मतदारसंघावर दावा केला जात असल्याने रोहित पवारांच्या मतदारसंघात ऐनवेळी बंडाचं निशाण फडकू शकते.

काँग्रेसने केवळ या जागेवर दावाच केला नाही, तर मित्र पक्षांना कायम सहकार्य करत भूमिका बजावली आहे. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना सातत्याने डावलल जात असल्याचा आरोप काँग्रेसच्या कैलाश शेवाळे यांनी केलाय.

दरम्यान, वरिष्ठ पातळीवर महाविकास आघाडीत आलबेल असल्याचे चित्र पाहायला मिळत असलं तरी स्थानिक पातळीवर मात्र आगामी काळात जागा वाटपावरून संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे. त्यातल्या त्यात रोहित पवारांना भाजपसोबतच महाविकास आघाडीतील मित्र पक्षाचाही विरोध पत्करावा लागत आहे.

---

## बांगलादेशात कोल्हापूरचे १५ विद्यार्थी अडकले

# त्यांना सुखरूप आणण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत; सतेज पाटलांची मागणी

**कोल्हापूर :** त्करंजित संघर्ष सुरु असलेल्या बांगलादेशमध्ये कोल्हापूरचे १५ विद्यार्थी अडकले आहेत. अडकलेल्या विद्यार्थयांच्या सुटकेसाठी माझी वरिष्ठ स्तरावर चर्चा सुरू असल्याचे आमदार सतेज पाटील यांनी म्हटले आहे. बांगलादेशमध्ये अडकलेल्या१५ विद्यार्थ्यांनी माझ्याशी संपर्क केला असल्याचे त्यांनी सांगितले. सतेज पाटील यांनी सांगितले की, अजून विद्यार्थी आणि नागरिक असतील तर त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. बांगलादेशमध्ये१५ विद्यार्थी कुठे आहेत हे जाहीरपणे सांगणे योग्य नाही. त्यांना सुखरूप आणण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत.त्यांच्या सुटकेसाठी माझी वरिष्ठ स्तरावर चर्चा सुरू असल्याचे ते म्हणाले.



भारतीय दूतावासातील १९० कर्मचारी परतले

दरम्यान, भारतीय दूतावासातील १९० कर्मचारी बांगलादेशातून परतले आहेत. वृत्तानुसार, ढाकामध्ये अजूनही २० ते ३० कर्मचारी आहेत. हिंसाचारामुळे बांगलादेशचे ७५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. बांगलादेशात झालेल्या हिंसक निदर्शनांमुळे गेल्या १५ दिवसांत ७५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. यामध्ये वस्त्रोद्योगाला सर्वाधिक २० हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

एअर इंडिया, विस्तारा, इंडिगो आजपासून ढाक्यासाठी विमानसेवा सुरू करणार

दुसरीकडे, एअर इंडिया, विस्तारा आणि इंडिगो बुधवारी दिल्ली ते ढाका त्यांची नियोजित उड्डाणे चालवतील. बांगलादेशच्या राजधानीतून लोकांना परत आणण्यासाठी एअर इंडियाही विशेष विमान पाठवू शकते.

हसिना सरकारमधील अनेक मंत्री बांगलादेश सोडून गेले

डेली स्टारच्या वृत्तानुसार, हसीनाच्या सरकारमध्ये शिक्षण मंत्री असलेले मोहिबुल हसन चौधरी आणि ग्रामीण विकास मंत्री मोहम्मद ताजुल इस्लाम कुटुंबातील अनेक सदस्यांसह देश सोडून पळून गेले आहेत. वृत्तपत्रातील सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती देण्यात आली आहे. माजी अर्थमंत्री अबुल हसन महमूद अली, क्रीडा मंत्री नजमुल हसन पापोन आणि ढाका दक्षिण शहर कॉर्पोरेशनचे महापौर शेख फझले नूर तपोश, मुन्शीगंज-३च्या माजी खासदार मृणाल कांती दास आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मोहम्मद बदरूज्जमान यांनीही देश सोडला आहे.

बंगाली वृत्तपत्र डेली सनच्या वृत्तानुसार, भारताने तात्काळ शेख हसीना यांना देशात राहण्याची परवानगी दिली आहे. हसीनाने ब्रिटनमध्ये राजनैतिक आश्रय मागितला आहे. शेख हसीना यांना आश्रय देण्याच्या मुद्द्यावर ब्रिटनने सध्या मौन पाळले आहे. तिथून परवानगी मिळताच त्या भारत सोडणार आहेत. हसीना यांच्यासोबत त्यांची बहीण रिहाना सुद्धा आहेत. ज्यांच्याकडे ब्रिटिश नागरिकत्व आहे. हसीना यांची भाची आणि रिहाना यांची मुलगी ट्यूलिप सिद्दीक या लेबर पार्टीच्या खासदार आहेत.

---

## माढा विधानसभेसाठी संदीप साठेंना उमेदवारी द्या

# तालुका काँग्रेस कमिटीची नाना पटोलेंकडे मागणी

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केलीय. तसेच इच्छुकांनी गाठी भेटी, बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. अशातच माढा विधानसभा मतदारसंघाची देखील जोरदार चर्चा सुरु आहे. महाविकास आघाडीकडून ही जागा काँग्रेसला सोडावी अशी मागणी केली जातेय. माढा तालुका काँग्रेस कमिटीकडून संदीप साठे यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना याबाबतचे निवेदन दिले आहे. पटोले यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती संदीप साठे यांनी दिली आहे.

२०१४ ला काँग्रेसने माढा विधानसभेची निवडणूक लढवली होती. यावेळी काँग्रेसकडून कल्याणराव काळे यांनी निवडणूक लढवली होती. यावेळी त्यांना ६५ हजार मते मिळाली होती. मात्र, काळेंचा राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बबनदादा शिंदे यांनी पराभव केला होता. दरम्यान, त्या निवडणुकीत सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संदीप साठे यांनी काँग्रेसच्या प्रचाराची धुरा सांभाळली होती. निष्ठेने त्यांनी काँग्रेसचे काम केले होते. या मतदारसंघात काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळं माढा विधानसभेची जागा काँग्रेसला देण्यात यावी अशी मागणी माढा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय काका पाटील यांनी नाना पटोले यांच्याकडे केली आहे. नाना पटोलेंनी याबाबत प्रदेश काँग्रेसला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

संदीप साठे हे पश्चिम महाराष्ट्रातील पहिले सहकारमहर्षी गणपतराव साठे यांचे नातू आहेत.

युवक काँग्रेसच्या चळवळीत देखील त्यांनी काम केले आहे. सध्या ते प्राध्यपाक आहेत. माढा तालुक्यात सध्या बबनदादा शिंदे हे आमदार आहेत. ते सध्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात आहेत. माढा विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेसला सुटते. मात्र, बबनदादा शिंदे अजित पवार गटात गेल्यानं महाविकास आघाडकडून ही जागा काँग्रेसला सोडावी अशी मागणी केली जातेय. दरम्यान, यावेळी माढा विधानसभा मतदारसंघातून बबनदादा शिंदे यांचे पुत्र हे निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या काळात माढा मतदारसंघात राजकीय समीकरणे बदलली आहेत. माढा लोकसभेला भाजपचे रणजितसिंह निंबाळकर यांचा पराभव झाला आहे. या मतदारसंघातून धैर्यशील मोहिते पाटील हे निवडूण आले आहेत. मोहिते पाटील यांनी शरद पवार गटात प्रवेश केल्याने सोलापूर जिल्ह्यात पुन्हा राष्ट्रवादीची ताकद वाढली आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत माढा विधानसभा मतदारसंघातून मोहिते पाटील यांना ५२ मतांचा लीड मिळाला आहे. त्यामुळे माढा विधानसभेला महाविकास आघाडीकडून कोणाला उमेदवारी द्यायची याबाबत मोहिते पाटील यांचे मत विचारात घेतले जाण्याची दाट शक्यता आहे.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्याशी आमचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याची माहिती संदीप साठे यांनी दिली. विजयसिंह मोहिते पाटील यांचे वडिल दिवंगत शंकरराव मोहिते पाटील हे सोलापूर जिल्हा बँकेचे पहिले चेअरमन होते. त्यावेळी चेअरमन पदाच्या निवडीवेळी संदीप साठे यांचे वडील वसंतराव साठे यांनी शंकरराव मोहिते पाटील यांना सहकार्य केले होते. वसंतराव साठे हे त्यावेळी जिल्हा बँकेचे संचालक होते. त्यावेळी वंसतराव साठे यांनी जिल्हा बँकेचे अध्यक्षपद स्वीकारावं अशी काही जणांनी मागणी केली होती.

---

## जनतेचे न्यायालय सर्वोच्च, बांगलादेशमध्ये तेच आज होतंय

### तो इशारा सर्वासाठी; उद्धव ठाकरेंची प्रतिक्रिया

**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्ली दौऱ्यावर आहेत. आज (७ जुलै) दिल्लीमध्ये पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी बांगलादेशमधील स्थितीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर खोचक शब्दांमध्ये टीका केली. अमित शाह आणि पीएम मोदी मणिपूरला जाऊ शकले नाहीत ते बांगलादेशला जाणार असेल तर त्यांनी जावं आणि ज्या पद्धतीने रशिया- युक्रेन युद्ध थांबवले म्हणत होते, त्या पद्धतीने बांगलादेश युद्ध सुद्धा थांबवावे अशी टिप्पणी केली. बांगलादेशमध्ये आज जे काही घडत आहे ती सर्वसामान्य माणसाची प्रतिक्रिया असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.

बांगलादेशमध्ये आज जे काही घडले, तो इशारा आपल्या सर्वासाठी

उद्धव ठाकरे यांनी सांगितले की आज पाकिस्तान बांगलादेश श्रीलंकेमध्ये जी स्थिती झाली आहे यावरून एकच लक्षात येते की जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. इस्त्रायलमध्येही हजारो लोक रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी पंतप्रधानांना घरातून बाहेर पडणं अशक्य झालं होतं. ते पुढे म्हणाले की अशी परिस्थिती आपल्याकडे येऊ नये. बांगलादेशमध्ये आज जे काही घडलं आहे तो इशारा आपल्या सर्वासाठी असून जनतेचे न्यायालय सर्वोच्च असल्याचे ठाकरे म्हणाले. कोणीच स्वत:ला देवापेक्षा मोठे मानू नये, असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी मोदी यांना लगावला. मोदी यांनी लोकसभा निवडणुकीत देवानेच मला पाठवल्याचे वक्तव्य केले होते.

दरम्यान, बांगलादेशमधून परागंदा होण्याची वेळ आल्यानंतर बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना भारतामध्ये आश्रयासाठी आल्या आहेत. शेख हसीना यांना भारत सरकारकडून संरक्षण देण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना उद्धव ठाकरे यांनी आज शेख हसीना यांना संरक्षण देणार असाल, तर बांगलादेशमधील हिंदूंचे सुद्धा रक्षण करावे अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

---

### सौद्यातील बेदाणा उधळणीवर अखेर निर्णय

**तासगाव :** तासगाव बाजार समितीत बेदाणा सौद्यात बेदाण्याची उधळण होऊन शेतकऱ्यांच्या होणाऱ्या लुटीवर अखेर एकमुखी निर्णय घेण्यात आला. व्यापारी, अडते व बाजार समितीचे सर्व संचालक यांची बैठक झाली. या बैठकीत प्रत्येक बेदाणा कलमामध्ये

साडेसातशे ग्रॅम पर्यंतच तूट धरण्याचा निर्णय घेण्यात आला. यापेक्षा जास्त तूट होत असेल तर त्याचे पैसे अडत्यांनी धनादेशाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्याचा निर्णयही घेण्यात आला. त्यामुळे बेदाणा उधळणीला काही प्रमाणात तरी लगाम बसेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत बेदाणा सौद्यावेळी बेदाण्याच्या उधळणीतून कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असते.

---



## बांगलादेशमधील अराजकतेचा महाराष्ट्राला मोठा फटका!

**मुंबई :** बांगलादेशातील अराजकाचा परिणाम नाशिकमधील कांदा निर्यातीवर झाला आहे. गेल्या ४८ तासांपासून कांद्याचे ट्रक सीमेवर अडकून पडले आहेत. मंगळवारी मध्यरात्री कांदा बांगलादेशात जाणे अपेक्षित होते. नाशिकहून बांगलादेशला जाणारे कांद्याचे रोजचे ८० ट्रक सीमेवर थांबले आहेत. जर कांद्याचे ट्रक तिथेच अडकून राहिले तर ते खराब होतील. यामुळे व्यापाऱ्यांना करोडोंचे नुकसान होऊ शकते.

बांगलादेशात हिंसाचार उफाळला असून सर्वसामान्य जीवन विस्कळीत झाले आहे. घरे, कार्यालये पेटवली जात असताना सध्या बांगलादेशात जाणे संकटात जाण्यासारखे आहे. केंद्र सरकारही सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पावले उचलत आहे. याचमुळे बांगलादेशला निघालेले हे ट्रक सीमेवर थांबवण्यात आले आहेत. जवळपास ३ हजार टन कांदा या ट्रकमध्ये असल्याची माहिती आहे.

भारतातून दरवर्षी बांगलादेशात कांदा निर्यात केला जातो. २०२३-२४ मध्ये भारतातून होणाऱ्या एकूण कांदा निर्यातीपैकी २०.३ टक्के कांदा बांगलादेशात पाठवण्यात आला होता. भारताच्या प्रमुख आयातदारांपैकी बांगलादेश आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशात सुरु असलेल्या अराजकतेचा परिणाम कांदा निर्यातीवर झाला आहे.

कांद्याचे शेकडो ट्रक भारत-बांगलादेशच्या सीमेवर अडकले आहेत. नाशिकहून रोज ७० पेक्षा जास्त कांद्याचे ट्रक बांगलादेशला रवाना होत असतात. सीमेवरच कांद्याचे ट्रक थांबल्याने व्यापाऱ्यांचे करोडोंचे नुकसान झाले आहे. अडकलेला कांदा जवळच्या सीमेवर विक्री केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

महाराष्ट्रातील दरांवर परिणाम?

सध्या राज्यात कांद्याचे भाव स्थिर आहेत. आवक कमी असल्याने सध्या बाजारभाव २००० ते २७०० पर्यत आहे. पण जर कांदा निर्यात झाला नाही तर याचा परिणाम स्थानिक बाजारपेठेवर होईल. कांद्याची आवक वाढल्याने कांद्याचे भाव गडगडतील ज्यामुळे कांदा शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागेल. त्यामुळे केंद्र सरकारने इतर देशांमध्ये अधिक कांदा निर्यातीवर लक्ष द्यावे अशी मागी केली जात आहे.

---

# मनोज जरांगे पाटील निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यानं राजकीय समीकरण बदलणार?

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी एक वर्षापासून लढा सुरू असूनही मराठा आरक्षण मिळत नसेल, तर सत्तेत जाण्याशिवाय पर्याय नाही, असे ठाम मत मराठा आरक्षणाचे आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या या वक्तव्याने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांचे धाबे दणाणले आहे. जरांगे यांनी स्वत:ची उक्ती जर कृतीत आणली तर राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी अशी राजकीय लढाई सुरू असताना त्यांचा निर्णय विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्षांसाठी हानिकारक ठरू शकतो.

निवडणुकीच्या रिंगणात उतरणार : गेल्या एका वर्षापासून मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांना सरकारकडून आश्वासन देण्यात येत आहेत. पण ती पूर्ण होत नसल्याचा जरांगे यांचा आरोप आहे. म्हणूनच आता त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय जाहीर करत वातावरण तापते ठेवले आहे. त्यांनी बुधवार, ७ ऑगस्टपासून पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केला आहे. 'शांतता संवाद यात्रे'द्वारे ते संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. आतापर्यंत त्यांनी काढलेल्या शांतता रॅलीला मोठ्या प्रमाणात



जनतेकडून प्रतिसाद मिळाला आहे. आता न्याय्य हक्कासाठी जनता घरात बसणार नाही, यापुढंही असाच प्रतिसाद शांतता रॅलीला मिळत राहील, असा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे.

''मराठ्यांचे वाटोळ करणारे सरकार'' : ''आम्हाला राजकारणात जायचे नाहीय. तुम्ही आम्हाला समजून घ्या. राज्यात जितके राजकीय पक्ष आहेत त्यांनी सर्वांनी सांगायला पाहिजे की, मराठ्यांना ओबीसीतील आरक्षण द्यायला हवे. तुमच्याकडे सत्ता आहे, बहुमत आहे. परंतु मराठ्यांचे वाटोळ करायला हे सरकार आले असून हे आता मराठ्यांनी समजून घ्यायला पाहिजे. २९ ऑगस्टपर्यत आरक्षण दिले तर सर्व विषय संपेल. आरक्षण दिले नाही तर मात्र आमच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आम्ही राजकारणात उतरणार'', असे मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर करुन टाकलं आहे. त्यानुसार मोर्चेबांधणी करण्यासाठी अंतरवाली सराटीमध्ये १४ ऑगस्ट ते २० ऑगस्ट दरम्यान इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. मराठा समाजातील अनेक तरुणांनी आगामी विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या सर्व प्रस्तावांवर २९ ऑगस्टला निर्णय घेतला जाणार आहे. या दिवशी संपूर्ण राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव उपस्थित राहणार आहे. उमेदवारी देण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे'', असे ते म्हणाले.

जरांगे फॅक्टर जोरात : लोकसभा निवडणुकीनंतर महायुतीच्या खासदारांची संख्या ४१ वरून १७ वर आली. त्यासाठी विविध कारणं दिली गेली. त्यामध्ये मराठा आरक्षणसुद्धा एक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केले होते. मराठा आंदोलनाचे यश म्हणजे महाराष्ट्रमध्ये यंदा प्रथमच ४८ खासदारांमध्ये २६ मराठा खासदार निवडून आले आहेत. ही टक्केवारी एकूण खासदारांच्या ६० % आहे. अशाच प्रकारे येत्या विधानसभा निवडणुकीतसुद्धा मराठा समाजाचे आमदार विक्रमी संख्येनं निवडून येतील, अशी शक्यता आहे. मराठवाड्यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा फार चालला. मराठवाड्यात आठ पैकी आठ खासदार मराठा निवडून आले. छत्रपती संभाजीनगरची जागा सोडली, तर इतर सात जागांवर महायुतीचा दारुण पराभव झाला. माजी केंद्रीय राज्यमंत्री, भाजपा नेते, रावसाहेब दानवे यांनासुद्धा मराठा आरक्षणाचा मोठा फटका बसून पराभवाला सामोरं जावं लागल्याचं मान्य केलं आहे. मराठवाड्यासह विदर्भ, मुंबई, कोकण तसंच पश्चिम महाराष्ट्रातसुद्धा जरांगे फॅक्टरचा प्रभाव पाडत चालला आहे.

आम्हाला निवडणुकीची भाषा शिकवू नका : या विषयावर बोलताना भाजपा नेते मुंबई अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले, ''मनोज जरांगे पाटील, भारतीय जनता पक्षाला संपवण्याची सुपारी ज्या ज्या लोकांनी घेतली त्याबद्दल तुम्ही थोडा अभ्यास करा. आम्ही समाजाबरोबर आहोत, समाज आमच्या बरोबर आहे. तुमच्या सोबतीला संपूर्ण समाज आहे, या गैरसमजात राहू नका. तुम्ही निवडणुकीची भाषा बोलत असाल तर आम्ही तयार आहोत. अनेक निवडणुकांमध्ये विजय, पराभव पचवले आहेत.

---



**विद्युत खांबावरील या हिरव्यागार वेली ठरणार का अपघाताला निमंत्रण ?...सातारा शहरात सध्या संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे .त्यातच वारंवार होणाऱ्या वीज पुरवठा खंडित प्रकारामुळे सातारकर अक्षरशः त्रस्त झाले आहेत .शहरातील अनेक उंच उंच अशा या विजेच्या खांबावर वाढलेल्या हिरव्यागार वेली अपघाताला निमंत्रण ठरणार नाहीत ना ?असाच प्रश्न सामान्य सातारकरांना पडत आहे. देवी चौक परिसरातील हे दृश्य आपल्या कॅमेरा टिपले आहे अतुल देशपांडे सातारा यांनी.**